शोधनिबंध

# तुकारामांचे पाईक अभंग


**प्रा. किशोर जनार्दन लांडेपाटील**
**हुतात्मा राजगुरू महाविद्यालय,**
**राजगुरूनगर, ता. खेड, जि. पुणे**
**भ्रमणध्वनी – 9420174503.**


**01 प्रस्तावना :–**

मराठयांचा आद्य इतिहासकार ग्रॅंट डफ याने मराठी सत्ता उदयासंदर्भात 'वणवा सिध्दांत' मांडला. त्याला प्रतिवाद म्हणून राष्ट्रवादी इतिहास लेखन प्रवाह निर्माण झाला. न्या. रानडे यांनी आपल्या मराठी सत्तेचा उदय आणि उत्कर्ष या ग्रंथात, मराठी सत्ता अचानक निर्माण झाली नसून ज्ञानेश्वरांपासून तुकारामांपर्यंतच्या संतांनी त्यासाठी आवश्यक ती पार्श्वभूमी तयार केल्याचे स्पष्ट केले आहे. भारतात आजवर लोकमनाशी भावनिक संबंध ज्ञानेश्वर तुकारामांसारख्या संतांनी जोडले असले तरी, महाराष्ट्रात ही किमया शिवाजी महाराजांनी साध्य केली. [1]

श्री. सुरेंद्र दरेकर म्हणतात त्याप्रमाणे, ':...ज्ञानदेवांपासून तुकोबांपर्यतच्या प्रवासाला एका राजकीय सत्तासंक्रमणाचा संदर्भ दिसून येतो. ज्ञानदेव, नामदेव हे इस्लाम भारतात संक्रमित होत असतानाचे निरीक्षक. एकनाथांचा काल पूर्ण पारतंत्र्याचा, तर तुकोबा शिवस्वराज्य काळाचे साक्षीदार''.[2] महाराष्ट्राच्या इतिहासात तुकाराम व शिवाजींचे स्थान केंद्रवर्ती व अनन्यसाधारण आहे. संत तुकाराम व छत्रपती शिवाजी महाराज समकालीन होते. शिवाजी महाराजांचे राजकीय कार्य व तुकारामांचे अध्यात्मिक कार्य या दोन्हींनी महाराष्ट्राला नवी दिशा दिली. दोघांनी तत्कालीन समाजमन भारून टाकले होते. तुकारामांनी आपल्या लेखनकार्यातून शिवाजी महाराजांच्या स्वराज्य कार्यासाठी अनुकुल अशी वातावरण निर्मिती करून लोकांमध्ये स्वराज्य स्थापनेच्या कार्यात सहभागी होण्याची प्रेरणा निर्माण केली. व त्याचा शिवाजी महाराजांना स्वराज्य कार्यासाठी उपयोग झाला. नंतरच्या काळात फ्रेंच राज्यक्रांतीत रूसोने जसे क्रांतीस अनुकूल लोकमानस घडविले त्याच प्रकारचे कार्य त्याही मागे शतकभर तुकारामांनी स्वराज्य निर्मितीसाठी केले. तुकारामांनी आपल्या अकरा [3] अभंगांमधून पाईकपणाचे, शूरपणाचे महत्त्व, लक्षणे, वेगळेपण विशद केले आहे. पाईकपणा म्हणजे शूरत्व, वीरत्व, धैर्य, सेवकपणा, सेवा होय आणि जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात काम करणा–या माणसाला हे गुण अंगी असणे आवश्यक आहे. कारण हे गुण अंगी बाळगणारा माणूस ज्या क्षेत्रात असेल तिथे त्याचा नावलौकिक झाल्याशिवाय राहणार नाही. तो सर्वांना प्रिय असेल आणि त्याच्या हातून समाजाचे, मानवजातीचे भले होईल म्हणून सर्वांच्या अंगी असा पाईकपणा, सेवकपणा यावा ही तुकारामांची इच्छा आहे. अर्थात आपण सांगत असलेले शूरपणाचे, सेवकपणाचे विचार जे खरे शूर आणि सेवक आहेत त्यांनाच पटू शकतील असे तुकाराम म्हणतात. अशा पाईकपणाच्या या अभंगांचा विचार, अभ्यास कसा करावा याबाबत प्र. न जोशी म्हणतात की, ''तुकाराम महाराजांच्या या विशेष अभंगांचा अर्थ दोनही प्रकारांनी लावता येण्यासारखा आहे. शिवबा व त्यांचे स्वराज्यसाधनेचे कार्य व

त्यासाठी तळहातावर शीर घेऊन निघालेले वीर सेवक यांच्या धैर्याचे व काहींच्या कुचराईचे वर्णन बुबांनी केले आहे. हे सर्व वर्णन परमार्थाच्या मार्गावर निघालेल्या विठ्ठलाच्या वीर पुरूषांनाही यथार्थपणे लागू पडते''. [4] म्हणजे भक्त हा शूर पाईकासारखाच असतो हे यातून सूचित होते आहे. या अभंगातील विचारानुसार शूर, वीरपणा, सेवकपणा हे केवळ गुण नसून ती वृत्ती आहे, अशी तुकोबांची धारणा आहे, म्हणूनच तुकारामांना अपेक्षीत असलेला पाईकपणा सर्व क्षेत्रातील माणसांना यशस्वी होण्यासाठी आणि आनंदी होण्यासाठी आजही अंगी बाळगणे आवश्यक आहे.

**02 पाईकाचे अभंग :—**

जीवावर उदार होवून समोरील बाणांचा, तोफगोळयांचा वर्षाव छाती पुढे करून झेलणारा, शत्रूच्या चोर वाटा शोधणारा, निःस्वार्थीपणे कार्य करणारा म्हणजे शरीर गवताप्रमाणे क्षुल्लक मानणारा आणि सोने दगडासारखे समजणार, चांगली सेवा हेच वेतन मानणारा, धैर्याने शत्रूवर तुटून पडणारा, सर्व शक्तीनिशी आपल्या धन्याचे आणि त्याच्या राज्याचे रक्षण करणारा, चुकणा—यांना, गैरवर्तन करणा—यांना शासन करणारा, प्रजेचे रक्षण करणारा, आपल्या स्वामीस कमीपणा येईल असे कोणतेही कृत्य न करणारा अशी पाईकाची नानाविध वैशिष्टये तुकारामांनी सांगितली आहेत. तुकाराम म्हणतात की, जो याप्रमाणे कार्य करतो तो शिपायाचा नाईक बनतो, म्हणजे त्याला सतत बढती मिळते, तो सर्वांना प्रिय होतो. त्याला सर्वत्र मानसन्मान मिळतो. म्हणून सर्वांनी पाईकपणाचे गुण आत्मसात करावयास हवे अशी त्यांची धारणा आहे. म्हणून ते म्हणतात, ''तरि व्हावे पाईक जिवाचे उदार। सकळ त्यांचा भार स्वामी वाहे।''[5] जीवावर उदार होवून सेवक व्हावे. तुमचा सर्व भार देव वाहिल म्हणजेच निष्काम कर्म करावे, फळाची अपेक्षा करू नये. खरे म्हणजे फळाची अपेक्षा न करता कर्म करावे याचा अर्थ चांगले कर्म असेल तर त्याचे चांगलेच फळ मिळणार त्याची वाट पाहण्याची, त्यासाठी अपेक्षा ठेवण्याची गरज नाही. पण चांगले कर्म करण्यासाठी संयमाने मोहाचे क्षण टाळावे लागतात आणि म्हणूनच चांगले कर्म करण्यासाठी शूरपणा, सेवकवृत्ती अंगी असणे गरजेचे आहे.

धैर्याचे मोल सांगताना, ''तुका म्हणे मरण आहे या सकळां। भेंणे अवकळा अभयें मोल।''[6] म्हणजे मरण कधी ना कधी सर्वांनाच येणार आहे पण त्याची सतत चिंता करत बसण्याने तुम्हाला जीवनाचा अनुभव येवू शकत नाही. मात्र धैर्याने वागलात तर जीवनाला मोल, किंमत प्राप्त होईल. तुमची प्रतिष्ठा वाढेल. त्यासाठीच पाईकपणा, सेवकपणा महत्त्वाचा आहे. आपले सर्वस्व आपल्या धन्यासाठी, स्वामीसाठी खर्च करण्याची प्रतिज्ञा या सेवकाने घेतलेली असते. अशी ही निकराची भावना भक्तीस पोषकच आहे. ईश्वरप्राप्तीसाठी मनोभावे प्रार्थना करणे, भक्ती करणे म्हणजेच स्वतःला विसरून ईश्वराशी एकरूप होणे होय. अशी भक्ती करणा—या भक्तांनाच ईश्वरप्राप्ती होते अशी संतांची धारणा असते. त्याचप्रमाणे जे पाईक आपल्या धन्याच्या स्वामीच्या सेवेत एकरूप झालेले असतात त्यांनाच मानसन्मान मिळत असतो. सेवेचा आनंद मिळत असतो.

खरे तर पाईकपणाची, सेवकपणाची वृत्ती जीवनात यशस्वी होण्यासाठी आवश्यकच असते. कारण कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी त्याच्याशी एकरूप होणे आवश्यक असते. तरच चांगले यश मिळू शकते. यश नाही मिळाले तरी कार्यसमाधान तर नक्कीच मिळत असते. म्हणूनच शूरपणा, सेवकपणा, सेवाभाव जपणारीच माणसं सर्व क्षेत्रात यशस्वी झालेली आणि आनंदी असलेली पहावयास मिळतात. याउलट कामचुकारपणा करणारे, सेवा केल्याचे नाटक करणारे आपणास सतत चिंतेत दिसतात म्हणून सेवाभाव, पाईकपणा जीवनाच्या यशाचे, आनंदाचे सूत्र आहे असे आपणास म्हणता येईल.

**03. समारोप :–** जीवनाच्या कोणत्याही क्षेत्रात यशस्वी होण्यासाठी धैर्य, संयम, शूरपणा, सेवकवृत्ती इ. गुणांची गरज आहे. असे गुण असणारी व्यक्तीच ख–या अर्थाने पाईक, उत्तम सेवक, शिपाई आहे. जीवनाचा यशस्वीतेसाठी व ते सुखकारक आनंदी करण्यास तसेच समाजाचे रक्षण आणि उत्तम पोषण करण्यासाठी, हे पाईकपणाचे गुणविशेष अंगी येण्यासाठी प्रयत्न करायला हवा. त्यातूनच देशाचे, समाजाचे, राज्याचे आणि कुटुंबाचे रक्षण व कल्याण होणार आहे. या गुणांचे मोल ज्यांच्या अंगी हे गुण आहेत त्यांनाच जाणवेल असे तुकाराम मानतात. तसेच ख–या पाईकाची ताकद महत्त्व आणि वेगळेपण समजण्यासाठी आपणास ते गुण आत्मसात करावे लागतील असा संदेश सर्व प्रजेला आणि शिपाई असणा–या सेवकांना तुकाराम अतिशय तळमळीने अंतःकरणापासून करतात. तुकारामांच्या शिकवणुकीने महाराष्ट्र संस्कृतीचे पोषण, संवर्धन झाले. मराठी समाज जीवनावरील त्यांच्या प्रभावाचा आवाका मोठा असल्याने साहजिकच यावेळी स्वराज्य निर्मिती व संवर्धनासाठी कार्य करणा–या शिवाजी महाराजांना अनुकूल लोकमानस घडणे व निष्ठावान, गुणवान, शूर, वीर पाईक मिळणेसाठी मदत झाली. म्हणजेच शिवरायांच्या स्वराज्य स्थापनेच्या कार्याला तुकारामांचे सहकार्य झाले आहे.

**संदर्भ आणि टीपा**

1. अधिक संदर्भासाठी पहा –
   अरविंद वामन कुलकर्णी, 'छत्रपती शिवाजी राजे : एक मूल्यमापन' समाविष्ट राष्ट्रतेज साप्ताहिक, छत्रपती शिवाजी महाराज विशेषांक, अलिबाग, मार्च 1980. पृ. 1 ते 4.
2. सुरेंद्र दरेकर, 'महाराष्ट्राच्या इतिहासातील तुकोबांचे स्थान' अप्रकाशित शोधनिबंध, पृ. 1.
3. 'श्रीतुकारामबाबांच्या अभंगाची गाथा' महाराष्ट्र शासन, पुणे शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे, 1950, अभंग क्रमांक 1061 ते 1071.
4. डॉ. प्र. न जोशी, 'श्रीतुकाराम महाराज यांची गाथा', (सार्थ व सविवरण), खंड पहिला, विदर्भ मराठवाडा बुक कंपनी, पुणे, 1994, पृ. 479.
5. 'श्रीतुकारामबाबांच्या अभंगाची गाथा' महाराष्ट्र शासन, पुणे शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे, 1950, अभंग क्रमांक 1062.
6. 'श्रीतुकारामबाबांच्या अभंगाची गाथा' महाराष्ट्र शासन, पुणे शासकीय फोटो झिंको मुद्रणालय, पुणे, 1950, अभंग क्रमांक 1072.